# ग्रामीण रस्ते सद्यस्थिती अहवाल
## ग्रा. पं. देवधे
## ता. लांजा, जि. रत्नागिरी.



**द्वारा**

**उन्नत महाराष्ट्र अभियान कक्ष - आयआयटी मुंबई**

**सर्वेक्षण व अहवाल लेखन**


अक्षय चव्हाण

तनया पंगेरकर

# अनुक्रमणिका

१. प्रस्तावना....2
२. उद्दिष्टे....3
३. कार्यपद्धती....3
४. लांजा तालुक्यातील रस्त्यांचे जाळे - द्वितीयक माहिती....4
५. गावाविषयी....5
६. रस्त्यांच्या जाळ्याचा नकाशा व सार्वजनिक मालमत्तांची नोंद....6
७. रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण....7
८. सर्वेक्षणातून मिळालेली माहिती....10
९. माहिती विश्लेषण....15
नियोजित रस्ते....15
अनियोजित रस्ते....15
१०. गावातील पूल/ साकव/ कॉजवे यांची सद्यस्थिती....18
११. इ- ग्रामस्वराज संकेतस्थळावरील उपलब्ध माहिती....20
११. सारांश....22
१२. शिफारशी....22
संलग्नक....24
संदर्भ....25
आभार....25

## १. प्रस्तावना

उन्नत महाराष्ट्र अभियान प्रकल्पांतर्गत जिल्हा परिषद - रत्नागिरी येथे 'भौगोलिक माहिती अधिकारी' (Geographic Information Officer - GIO) हे पद दि. १५ जून २०२३ पासून निर्माण केले गेले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील रस्त्यांचे जाळे, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, शाळा, सार्वजनिक वाहतूक, इ. क्षेत्रांतील महतीचे भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे एकत्रीकरण आणि नकाशांच्या रुपात सादरीकरण करणे हे या पदाचे मुख्य कार्य आहे. याचा उपयोग संबंधित प्रशासनाला विकासकामांच्या बाबतीत योग्य निर्णय घेण्यासाठी होईल.

सदर प्रकल्पांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर लांजा तालुक्यातील रस्त्यांच्या जाळ्यांचे एकत्रित माहिती संकलन केले जात आहे. भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर करून रस्त्यांचे विविध प्रकार, संबंधित योजना, आत्तापर्यंत झालेला खर्च, रस्ते गुणवत्तेची सद्यस्थिती, इ. चा एकत्रित माहितीसंग्रह (Integrated Database) नकाशांच्या रूपात प्रदर्शित केला जात आहे, ज्याचा उपयोग शासनाला रस्ते विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी होईल. विविध कार्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचे संकलन, वर्गीकरण आणि विश्लेषण करणे व प्रत्यक्ष गावांमध्ये फिरून रस्त्यांचे जाळे आणि गुणवत्तेचे सर्वेक्षण करणे अशा दोन टप्प्यांमध्ये या प्रकल्पाचे काम केले जात आहे.

## २. उद्दिष्टे

१. रस्त्यांचे जाळे, गुणवत्ता, खर्च, संबंधित योजना इ. चे एकत्रित स्वरूपात माहिती संकलन करणे.
२. नकाशांच्या रूपात माहितीचे सादरीकरण करणे.
३. रस्ते विकास कार्यक्रमाच्या प्राधान्यक्रमासाठी शासनाला उपयुत शिफारशी करणे.

## ३. कार्यपद्धती

**अ) द्वितीयक माहिती संकलन**

१. जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, सार्वजनिक बांधकाम विभाग, इ. कार्यालयांमधून तालुक्यातील रस्त्यांशी संबंधित सर्व द्वितीयक माहिती प्राप्त करणे.
२. उपलब्ध माहितीचे वर्गीकरण व संगणक प्रणालीमध्ये मांडणी करणे.
३. तालुका पातळीवरील माहितीचे विश्लेषण व त्यावर आधारित नकाशानिर्मिती करणे.

**ब) क्षेत्रभेट व सर्वेक्षण**

१. गावाची निवड करून ग्राम संबंधित पंचायतीतून गावातल्या रस्त्यांशी संबंधित आवश्यक माहिती मिळवणे.
२. गावातील मुख्य रस्ता व प्रत्येक वाडीपर्यंत जाणाऱ्या चारचाकी वाहन रस्त्यांचे प्रत्यक्ष फिरून सर्वेक्षण करणे. (प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात गावातील अंतर्गत पाखाड्या व पायवाटा नोंदवलेल्या नाहीत)
३. प्रत्येक रस्त्यावर दर ५०० मीटर अंतरावर रस्त्याची रुंदी, डांबरी भागाची रुंदी, गुणवत्ता यांची नोंद घेणे.
४. गावातील शाळा, दवाखाने, शासकीय कार्यालये, दुकाने, स्मशानभूमी, इ. सार्वजनिक ठिकाणांचे व मालमत्तांचे जिओटॅगिंग करणे. प्रत्येक रस्त्यावर अवलंबित लोकसंख्या किती आहे त्याची नोंद घेणे.

**क) अहवाल निर्मिती**

१. जीआयएस प्रणालीचा वापर करून गावातील रस्त्यांचे जाळे, रस्त्यांचा दर्जा व सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता दर्शविणारा गावाचा नकाशा तयार करणे
२. अहवाल लेखन
३. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, शाळा-महाविद्यालये, इ. ठिकाणी अहवालाचे सादरीकरण.


# ४. लांजा तालुक्यातील रस्त्यांचे जाळे - द्वितीयक माहिती

२०११ च्या जनगणनेनुसार लांजा तालुक्याची एकूण लोकसंख्या १,०६,९८६ आहे. तालुक्यामध्ये एकूण १२२ गावे आहेत ती ६० ग्रामपंचायतींमध्ये विभागली आहेत, तसेच तालुक्यामध्ये एक नगरपरिषद आहे. लांजा तालुक्यातील रस्त्याच्या जाळ्याची एकूण लांबी जवळपास १०१३ किलोमीटर असून त्यामध्ये एक राष्ट्रीय महामार्ग, पाच राज्य महामार्ग, चार प्रमुख जिल्हा मार्ग, सोळा इतर जिल्हा मार्ग व ३०५ ग्रामीण मार्ग यांचा समावेश आहे.

रस्त्यांची वर्गीकरणानुसार लांबी खालीलप्रमाणे (छायाचित्र १):

- राष्ट्रीय महामार्ग: २६.४१ किलोमीटर
- राज्य महामार्ग: ९८.४२ किलोमीटर
- प्रमुख जिल्हा मार्ग: ७५ किलोमीटर
- इतर जिल्हा मार्ग: १७३.४१ किलोमीटर
- ग्रामीण मार्ग: ६३९.५२ किलोमीटर

जिल्हा परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिकडच्या ५ वर्षांत सुमारे ३७३ किलोमीटर रस्त्यांची दुरुस्ती किंवा बांधकामे झाली आहेत. प्रतिवर्षी सरासरी ७५ किलोमीटर रस्त्यांची कामे केली गेली आहेत. हे प्रमाण लांजा तालुक्यातील एकूण रस्त्यांच्या लांबीच्या १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. रस्ता दुरुस्ती आणि बांधकामासाठी मागील ५ वर्षातील एकूण खर्च हा ७३.७२ कोटी रुपये, म्हणजेच, सरासरी २० लाख रुपये प्रति किलोमीटर एवढा खर्च झाला आहे. लांजा तालुक्यातील १२२ गावांपैकी २२ गावांमध्ये मागील पाच वर्षांत रस्ते दुरुस्ती किंवा बांधकाम झालेले नाही. पुढील नकाशा लांजा तालुक्यातील रस्त्यांची वर्गवारी दर्शवितो.





| रस्त्यांची वर्गवारी | एकूण रस्ते | लांजा तालुक्यातील रस्त्यांची लांबी (कि.) |
|---|---|---|
| राष्ट्रीय महामार्ग | १ | २६.४१ |
| राज्य महामार्ग | ५ | ९८.४२ |
| प्रमुख जिल्हा मार्ग | ४ | ७५.१ |
| इतर जिल्हा मार्ग | १६ | १७३.४१ |
| ग्रामीण मार्ग | ३०५ | ६३९.५२ |

**छायाचित्र १. लांजा तालुक्यातील रस्त्यांचा वर्गवारी नकाशा**

# ५. गावाविषयी


लांजा तालुक्यातील देवधे या ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या रस्त्यांच्या सर्वेक्षणाचा हा अहवाल आहे. देवधे ग्रामपंचायती अंतर्गत देवधे, मणचे व बौद्धवाडी तर्फे देवधे ही तीन महसुली गावे येतात. देवधे गावाचे क्षेत्रफळ ६७५.०१ हेक्टर असून गावाची लोकसंख्या १२८८ आहे. बौद्धवाडी तर्फे देवधे गावाचे क्षेत्रफळ ११४.६६ हेक्टर असून गावाची लोकसंख्या ४६४ आहे. मणचे गावाचे क्षेत्रफळ २४८.२१ हेक्टर असून लोकसंख्या ४८५ आहे. तीनही गावे लांजा तालुक्यापासून ७ किमी व रत्नागिरी या जिल्ह्याच्या ठिकाणापासून ३६ किमी अंतरावर वसलेली आहेत. आसगे, येरवंडे, धुंदरे, लांजा शहर, गवाणे, कुर्णे, वेरळ, पातेरगाव ही देवधे, मणचे व बौद्धवाडी तर्फे देवधे गावांच्या शेजारची गावे आहेत. देवधे गावात गोंधळीवाडी, हरमलेवाडी, गुरववाडी, गवळीवाडी, ब्राम्हणवाडी, खामकरवाडी, कोटकरवाडी, भातडेवाडी, दळवीवाडी, वरची सावंतवाडी, खालची सावंतवाडी आणि माळवाडी अशा एकूण १२ वाड्या आहेत. मणचे गावात मणचेकरवाडी व बौद्धवाडी तर्फे देवधे या गावात बौद्धवाडी अशा वाड्या आहेत.

**छायाचित्र २. देवधे, मणचे व बौद्धवाडी तर्फे देवधे गावांचा स्थाननिश्चिती नकाशा**



# ६. रस्त्यांच्या जाळ्याचा नकाशा व सार्वजनिक मालमत्तांची नोंद

देवधे ग्रामपंचायतीच्या हद्दीत येणाऱ्या देवधे, मणचे व बौद्धवाडी तर्फे देवधे या तीनही गावांमधील मुख्य रस्ते व प्रत्येक वाडीपर्यंत जोडणारे रस्ते वाहनाच्या सहाय्याने फिरून जीपीएस ॲप्लिकेशनच्या सहाय्याने त्यांचे ट्रॅक घेण्यात आले. उपग्रह छायाचित्र, शासकीय कार्यालयांमधून मिळालेली माहिती व प्रत्यक्ष सर्वेक्षणातून मिळालेली माहिती पडताळून गावाच्या रस्त्यांच्या जाळ्याचा नकाशा तयार केला. रस्त्यांची पाहणी करताना रस्त्याच्या आजूबाजूला असणारी सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता (कार्यालये, दवाखाने, शाळा, बस स्टॉप, दुकाने, सांस्कृतिक वास्तू, मंदिरे, स्मशानभूमी, इ.) यांची लोकेशनसहित छायाचित्रे घेतली. जीआयएस प्रणालीचा वापर करून गावातील रस्त्यांचे जाळे व सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता दर्शविणारा नकाशा (छायाचित्र ३) पुढीलप्रमाणे तयार केला आहे.




छायाचित्र ३. देवधे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांचे जाळे, सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता दर्शविणारा नकाशा

## ७. रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण

देवधे ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या रस्त्यांचे वाहनाने प्रत्यक्ष फिरून सर्वेक्षण करण्यात आले. रस्त्याच्या पृष्ठभागाच्या स्थितीनुसार रस्त्याच्या दर्जाचे ६ श्रेणींमध्ये पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले. पुढील तक्ता आपल्याला रस्त्याचा दर्जा, त्या दर्जाचे निकष आणि त्या दर्जाच्या रस्त्याचा नकाशामध्ये दिलेला रंग (पहा: छायाचित्र ५. देवधे ग्रापंचायत हद्दीतील रस्त्यांच्या जाळ्याचा दर्जानिहाय नकाशा - पान क्र. ९) दर्शवतो. हे वर्गीकरण प्रत्यक्ष वाहनाने रस्त्यावर फिरताना रस्ता कसा दिसतो व गाडी किती कमाल वेगाने फिरू शकते या आधारावर केले गेले आहे.

**तक्ता क्र. १ रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण**

| दर्जा | दर्जा श्रेणी | निकष | नकाशातील रंग |
|---|---|---|---|
| अ | चांगला | १. गुळगुळीत पृष्ठभाग.<br>२. पृष्ठभागाची सुयोग्य लेव्हल.<br>३. एकही छोटा वा मोठा खड्डा नाही.<br>४. वाहनाचा कमाल वेग - ५० किमी प्रति तास. | हिरवा |
| ब | मध्यम | १. खड्डे नाहीत, परंतु लेव्हलिंग नीट नाही.<br>२. पृष्ठभाग एकदम गुळगुळीत नाही.<br>३. वाहनाचा कमाल वेग ३५ ते ५० किमी प्रति तास. | जांभळा |
| क | खराब | १. खडबडीत पृष्ठभाग.<br>२. मध्येमध्ये छोटे खड्डे.<br>३. वाहनाचा कमाल वेग २० ते ३५ किमी प्रति तास. | पिवळा |
| ड | अति खराब | १. मोठे खड्डे.<br>२. डांबरीकरण बरेचसे गेलेले.<br>३. वाहनाचा कमाल वेग २० किमी प्रति तास. | गुलाबी |
| इ | कच्चा रस्ता | १. डांबरीकरण अद्याप केलेले नाही.<br>२. लाल मातीचा वाहनयोग्य कच्चा रस्ता | केशरी |
| फ | पायवाट | १. वाहनयोग्य रस्ता नाही.<br>२. पायी चालत जाण्यायोग्य वाट | लाल |

वरीलप्रकारे केलेले रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण पुढील छायाचित्रात दर्शविले आहे. (पहा. छायाचित्र क्र. ४ - पान क्र. ८) या छायाचित्रावरून रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण अधिक स्पष्ट होते.


खालीलप्रमाणे वर्गीकरणाचे निकष ठरवून देवधे ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या सर्व रस्त्यांचे सर्वेक्षण करून त्यांच्या दर्जाची नोंद केली. रस्त्यांचे जीपीएस ट्रॅक घेऊन ते जीआयएस च्या सहाय्याने नकाशावर दाखवले व वेगवेगळ्या दर्जाच्या रस्त्यांना वेगवेगळे रंग दिले. अशाप्रकारे देवधे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या जाळ्याचा दर्जानिहाय नकाशा पुढीलप्रमाणे तयार केला. हा नकाशा देवधे ग्रामपंचायतीची हद्द, ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांचे जाळे, वेगवेगळ्या रंगांनी दर्शविलेले वेगवेगळ्या दर्जाचे रस्ते (पहा - तक्ता क्र.१ - रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण) दर्शवितो.




**छायाचित्र ४. रस्त्यांच्या दर्जाचे वर्गीकरण (प्रातिनिधिक छायाचित्र)**

खालील नकाशात काळ्या तुटक रेषेने दर्शविलेला रस्ता हा जागेवर नसल्याचे दिसून येते, तर हिरव्या रंगाने दर्शविलेले रस्ते 'चांगल्या दर्जाचे', जांभळ्या रंगाने दर्शविलेले रस्ते 'मध्यम दर्जाचे', पिवळ्या रंगाने दर्शविलेले रस्ते 'खराब दर्जाचे', गुलाबी रंगाने दर्शविलेले रस्ते 'अतिखराब दर्जाचे', केशरी रंगाने दर्शविलेले रस्ते 'कच्चे रस्ते' तर लाल रंगाने दर्शवलेले रस्ते या 'पायवाटा' आहेत. त्याचप्रमाणे नियोजित रस्ते हे सरळ रेषेने दाखविले असून अनियोजित रस्ते हे तुटक रेषेने दर्शविले आहेत.

**छायाचित्र ५. देवधे ग्रापंचायत हद्दीतील रस्त्यांच्या जाळ्याचा दर्जानिहाय नकाशा**



# ८. सर्वेक्षणातून मिळालेली माहिती

सर्वेक्षणातून नोंद केलेल्या रस्ता क्रमांक, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंतचा मार्ग, त्यावर असणारी सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता, त्या मार्गावरील अवलंबित लोकसंख्या, दर्जानुसार रस्त्याचे भाग, प्रत्येक भागाची लांबी, रुंदी, पेव्हमेंट, इ. बाबींची तक्त्याच्या स्वरुपात पुढीलप्रमाणे मांडणी केली. या तक्त्यामुळे गावाच्या रस्त्याच्या जाळ्यांचे चित्र स्पष्ट होते. कुठून कुठपर्यंतचा रस्ता किती लांबीचा आहे, त्यावर अवलंबित लोकसंख्या किती आहे, त्याचा दर्जा कसा आहे, त्या रस्त्याच्या आजूबाजूला सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता कोणत्या आहेत, त्या रस्त्याची रुंदी किती आहे या सर्व गोष्टी एका नजरेत आपल्याला कळतात.

**तक्ता क्र. २ सर्वेक्षणातून मिळालेली माहिती (नियोजित रस्ते)**

| अ. क्र. | रस्ता क्र. | एकूण रस्त्याची लांबी[1] (किमी) | रस्त्याची लांबी (गावातील) (किमी) | पासून | पर्यंत | मार्गावरील सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता | अवलंबित लोकसंख्या (अंदाजे) | रस्ता भाग क्र. | दर्जा | लांबी (किमी) | पेव्हमेंट रुंदी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | इ.जि.मा. १३० | १२.५ | ०.१७ | रा.मा.६६, देवधे | गवाणे, कोलधे, कोट रस्ता | १) बस स्टॉप | २०००+ | १ | क | ०.१७ | ५ | ३.५ |
| २) | ग्रा.मा २३८ | ०.५ | ०.३४ | रा.मा.६६, देवधे | वरची सावंतवाडी | - | ५० | १ | इ | ०.३४ | | ३.५ |
| ३) | ग्रा.मा २५८ | ०.६ | ०.७३ | ग्रा.मा.३ | हरमलेवाडी | १) शिवाजी महाराज पुतळा<br>२) शाळा १ ते ४ थी<br>३) अंगणवाडी<br>४) पिठाची गिरण<br>५) समाजमंदिर २ | ३०० | १ | इ | ०.२४ | ० | ५ |
| | | | | | | | | २ | क | ०.४९ | ३ | ५ |

[1] स्रोत: सार्वजनिक बांधकाम विभाग

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४) | ग्रा.मा २१३ | १.५ | ०.९६ | रा.मा.६६, देवधे बस थांबा | गवाणे गवळीवाडी | १) दवाखाना (खाजगी)<br>२) रेशन दुकान (देवधे) | ५० | १ | इ | ०.५२ | | |
| | | | | | | | | २ | क | ०.४४ | ३ | ५ |
| ५) | ग्रा.मा २१४ | १.० | ०.५४ | ग्रा.मा.२१३ | वरची सावंतवाडी | १) समाजमंदिर | २०० | १ | क | ०.१० | ३ | ५.५ |
| | | | | | | | | २ | रस्ता नाही | ०.३२ | - | - |
| | | | | | | | | ३ | इ | ०.११ | ३ | ६ |
| ६) | ग्रा.मा २२२ | १.० | ०.९१ | ग्रा.मा ४३ | देवधे माळवाडी - बौद्धवाडी रस्ता | १) शाळा १ ते ४ थी<br>२) अंगणवाडी<br>३) व्यायामशाळा<br>४) क्रीडांगण<br>५) रेशन दुकान (बौद्धवाडी तर्फे देवधे) | ५००+ | १ | ब | ०.५४ | ३ | ६.५ |
| | | | | | | | | २ | ड | ०.३३ | ३ | ६ |
| ७) | ग्रा.मा २५० | १.० | ०.६१ | रा.मा.६६ | ग्रा.मा.३, मधली वाडी | १) पोस्ट ऑफिस<br>२) लाकडाची गिरण | ५००+ | १ | इ | ०.६२ | ३ | ५ |
| ८) | ग्रा.मा २९ | ५.१ | ०.९२ | ग्रा.मा.३ | येरवंडे | - | २००+ | १ | अ | ०.३६ | ३.५ | ९ |
| | | | | | | | | २ | क | ०.५७ | ३ | ९ |
| ९) | ग्रा.मा ३ | ७.५ | ३.५० | रा.मा.६६ | आसगे बेनी रोड | १) हायस्कूल ८ ते १० वी<br>२) लक्ष्मी केशव मंगल कार्यालय<br>३) शाळा १ ते ७ वी | १५००+ | १ | इ | ०.६० | ३.५ | ९.५ |
| | | | | | | | | २ | ड | ०.५७ | ३ | ६ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ४) अंगणवाडी<br>५) ग्रामपंचायत कार्यालय<br>६) ख्रिस्ती आश्रम<br>७) कात भट्टी कारखाना<br>९) आयुर्वेदिक औषध कंपनी (काम चालू)<br>१०) बस स्टॉप | | ३ | क | १.२४ | ३ | ८.५ |
| | | | | | | | | ४ | क | १.०९ | ३ | ७.५ |
| १०) | ग्रा.मा ४२[2] | २.१ | ०.११ | **रस्ता अस्तित्वात नाही** | | - | - | १ | - | ०.११ | | |
| ११) | ग्रा.मा ४३ | २.० | २.०८ | ग्रा.मा.३ | गुरववाडी - मणचे ते धुंदरे | १) दवाखाना (खाजगी)<br>२) शाळा १ ते ७<br>३) अंगणवाडी<br>४) सिद्धिविनायक मंदिर<br>५) समाज घर<br>६) समाजमंदिर २ | ५००+ | १ | अ | ०.६६ | ३ | ७ |
| | | | | | | | | २ | ड | ०.२२ | ३ | ७ |
| | | | | | | | | ३ | इ | १.०४ | ३.५ | ६ |
| १२) | रा.मा १६५ | ७.० | ०.९९ | रा.मा.६६ | पुनस रोड | १) लाकडाची गिरण<br>२) बस स्टॉप | २०००+ | १ | अ | ०.९८ | ६ | १४ |
| १३) | रा.मा ६६ | २६.५ | ३.२३ | पातेरेगाव | लांजा शहर | १)पोस्ट ऑफिस<br>२) दवाखाना (खाजगी)<br>३) रेशन दुकान (देवधे)<br>४) लाकडाची गिरण<br>५) बस स्टॉप | २०००+ | १ | अ | ३.२३ | ७ | १४ |

[2] **ग्रा.मा.४२** हा नियोजित रस्ता कोट ग्रामपंचायत हद्दीमध्ये अस्तित्वात नाही असे सर्वेक्षणात आढळून आले.

## तक्ता क्र. ३ सर्वेक्षणातून मिळालेली माहिती (अनियोजित रस्ते)

| अ. क्र. | पासून | पर्यंत | मार्गावरील सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता | अवलंबित लोकसंख्या (अंदाजे) | दर्जा श्रेणी | लांबी (किमी) | पेव्हमेंट रुंदी (मी) | रस्त्याची रुंदी (मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ग्रा.मा.२५० | नवीन बौद्धवाडी वसाहत, मालवाडी | - | १००+ | इ | ०.३४ | ५ | ४ |
| २) | रा.मा.६६ | ग्रा.मा.२२२ | - | २००+ | क | ०.७७ | ३ | ६ |
| ३) | ग्रा.मा.२३८ | ग्रा.मा.२१४ | - | १००+ | इ | ०.१७ | | ३.५ |
| ४) | ग्रा.मा.२५० | बौद्धवाडी नवीन वसाहत, मालवाडी | - | १००+ | इ | ०.३० | - | - |
| ५) | ग्रा.मा.३ | होळीचा मांड, नवलाईदेवी मंदिर | १) होळीचा मांड<br>२) नवलाईदेवी मंदिर | ३००+ | इ | ०.६० | - | - |
| ६) | ग्रा.मा.४३ | मणचेकरवाडी | - | ५००+ | इ | ०.२८ | ३ | ४ |
| ७) | | मणचे स्मशानभूमी | १) स्मशानभूमी | ५००+ | इ | ०.७२ | - | ४ |
| ८) | ग्रा.मा.२२२ | मणचेकरवाडी, शेत | - | १००+ | इ | ०.८८ | ४ | ६ |
| ९) | ग्रा.मा.३ | शेत/ वैयक्तिक रस्ता | - | ५०+ | इ | ०.५५ | ३ | ६ |
| १०) | | शेत/ वैयक्तिक रस्ता | - | ५०+ | इ | १.१३ | - | - |
| ११) | ग्रा.मा.२५८ | गोंधळीवाडी | - | १००+ | इ | ०.१४ | - | - |
| १२) | ग्रा.मा.३ | रामभाऊ गुरव घर | - | २०+ | इ | ०.२४ | ३ | ६ |
| १३) | | गुरववाडी | - | २००+ | इ | ०.२१ | - | - |
| १४) | ग्रा.मा.४३ | मणचेकरवाडी | - | ५००+ | इ | ०.१२ | ३ | ४.५ |
| १५) | ग्रा.मा.३ | कोटकरवाडी, ब्राम्हणवाडी , खामकरवाडी | - | २००+ | ड | ०.३८ | ३ | ५ |
| १६) | ग्रा.मा.२२२ | बौद्धवाडी | १) शाळा १ ते ४ थी | ५००+ | क | ०.११ | ३ | ६.६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २) अंगणवाडी<br>३) व्यायामशाळा<br>४) क्रीडांगण<br>५) रेशन दुकान<br>(बौद्धवाडी तर्फे देवधे) | | | | | |
| १७) | | | | | इ | ०.११ | ० | ३.५ |
| १८) | | | | | इ | ०.१० | ३ | ४.५ |
| १९) | रा.मा.१६५ | वरची सावंतवाडी | - | १५०+ | इ | ०.४१ | - | - |
| २०) | ग्रा.मा.४३ | मणचेकरवाडी, गणेश विसर्जन स्थळ | १) गणेश विसर्जन स्थळ | २००+ | इ | ०.८१ | - | - |
| २१) | रा.मा.६६ | खालची सावंतवाडी | - | ३००+ | क | ०.३३ | ३ | ५.५ |
| २२) | ग्रा.मा.२१४ | गवाणे गवळीवाडी | - | ५०+ | इ | ०.१६ | ३ | ६ |
| २३) | ग्रा.मा.३ | ग्रा.मा.२५० | १) समाजमंदिर | १००+ | इ | ०.२८ | ३ | ६.५ |
| २४) | | | - | १००+ | इ | ०.४० | ४ | ४.५ |
| २५) | ग्रा.मा.२५० | बौद्धवाडी नवीन वसाहत, मालवाडी | - | १००+ | इ | ०.३६ | ४ | ६ |
| २६) | | रा.मा.६६ | १) नवलादेवी मंदिर | २००+ | ब | ०.३३ | ३ | ६.६ |
| २७) | | बौद्धवाडी | - | ५००+ | इ | ०.१५ | ६ | ३ |
| २८) | ग्रा.मा.२२२ | मणचेकरवाडी, शेत | - | २००+ | इ | ०.२६ | ४ | ६.५ |

# ९. माहिती विश्लेषण

सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीची तक्ता स्वरुपात मांडणी केल्यावर या माहितीचे विश्लेषण केले. यामध्ये नियोजित आणि अनियोजित प्रकारांमधील प्रत्येक रस्त्याची एकूण लांबी प्रत्येक दर्जा श्रेणीमध्ये असलेल्या रस्त्याच्या भागांची एकूण लांबी याचा तक्ता व आलेख पुढीलप्रमाणे तयार केला.

## नियोजित रस्ते

गावामधील असे रस्ते जे शासन निधीतून झाले आहेत व ज्या रस्त्यांना शासनाकडून वर्गवारी व रस्ता क्रमांक दिलेला आहे अशा रस्त्यांना **'नियोजित रस्ते'** असे म्हटले आहे. देवधे गावातील सर्वेक्षणात १ राष्ट्रीय महामार्ग, १ इतर जिल्हा मार्ग, १ राज्य महामार्ग व १० ग्रामीण रस्ते आढळून आले. या सर्व रस्त्यांची लांबीचे व दर्जाचे विश्लेषण खालील तक्त्यात केले आहे.

**तक्ता क्र. ४ देवधे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची दर्जा स्थिती (नियोजित रस्ते)**


| रस्ता दर्जा श्रेणी | ० | अ | ब | क | ड | इ | एकूण लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रस्ता क्र. | | | | | | | |
| राष्ट्रीय.मा.६६ | | ३.२३ | | | | | ३.२३ |
| इ.जि.मा.१३० | | | | ०.१७ | | | ०.१७ |
| राज्य.मा.१६५ | | ०.९८ | | | | | ०.९८ |
| ग्रा.मा.२१३ | | | | ०.४४ | | ०.५२ | ०.९६ |
| ग्रा.मा.२१४ | ०.३२ | | | ०.१० | | ०.११ | ०.५४ |
| ग्रा.मा.२२२ | | | ०.५४ | | ०.३३ | | ०.८८ |
| ग्रा.मा.२३८ | | | | | | ०.३४ | ०.३४ |
| ग्रा.मा.२५० | | | | | | ०.६२ | ०.६२ |
| ग्रा.मा.२५८ | | | | ०.४९ | | ०.२४ | ०.७३ |
| ग्रा.मा.२९ | | ०.३६ | | ०.५६ | | | ०.९२ |
| ग्रा.मा.३ | | | | २.३३ | ०.५७ | ०.६० | ३.५० |
| ग्रा.मा.४२ | ०.११ | | | | | | ०.११ |
| ग्रा.मा.२४३ | | ०.६५ | | | ०.२१ | १.०४ | १.९१ |
| **एकूण** | **०.४३** | **५.२३** | **०.५४** | **४.०९** | **१.१२** | **३.४८** | **१४.८९** |

## अनियोजित रस्ते

गावातील असे रस्ते जे गावकऱ्यांच्या श्रमदानातून किंवा ग्रामप्रशासन व विविध निधीतून तयार झाले आहेत, परंतु त्या रस्त्यांना शासनाकडून वर्गवारी व रस्ता क्रमांक दिलेला नाही अशा रस्त्यांना **'अनियोजित रस्ते'** असे म्हटले जाते. देवधे गावातील सर्वेक्षणात १९ अनियोजित रस्ते आढळून आलेत. या रस्त्यांपैकी काही रस्ते हे गावातील सार्वजनिक मालमत्तांकडे जातात, काही रस्ते गावातील वाड्यांपर्यंत जातात, काही रस्ते गावातील इतर रस्त्यांना जोडतात तर काही रस्ते शेतापर्यंत जातात. या सर्व रस्त्यांची लांबीचे व दर्जाचे विश्लेषण खालील तक्त्यात केले आहे.

### तक्ता क्र. ५ देवधे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची दर्जा स्थिती (अनियोजित रस्ते)

| पासून | पर्यंत | ब | क | ड | इ | फ | एकूण लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रा.मा.२१४ | गवाणे गवळीवाडी | | | | ०.१६ | | ०.१६ |
| ग्रा.मा.२२२ | बौद्धवाडी | | ०.११ | | ०.३६ | | ०.४७ |
| | मणचेकरवाडी, शेत | | | | १.१४ | | १.१४ |
| | रा.मा.६६ | ०.३३ | | | | | ०.३३ |
| ग्रा.मा.२३८ | ग्रा.मा.२१४ | | | | ०.१७ | | ०.१७ |
| ग्रा.मा.२५० | बौद्धवाडी नवीन वसाहत, मालवाडी | | | | १.४० | | १.४० |
| ग्रा.मा.२५८ | गोंधळीवाडी | | | | ०.१४ | | ०.१४ |
| ग्रा.मा.३ | कोटकरवाडी, ब्राम्हणवाडी, खामकरवाडी | | | ०.३८ | | | ०.३८ |
| | गुरववाडी | | | | ०.२१ | | ०.२१ |
| | ग्रा.मा.२५० | | | | ०.२८ | | ०.२८ |
| | रामभाऊ गुरव घर | | | | ०.२४ | | ०.२४ |
| | शेत/ वैयक्तिक रस्ता | | | | १.६८ | | १.६८ |
| | होळीचा मांड, नवलाईदेवी मंदिर | | | | ०.६० | | ०.६० |
| ग्रा.मा.४३ | मणचे स्मशानभूमी | | | | ०.७२ | | ०.७२ |
| | मणचेकरवाडी | | | | ०.४० | | ०.४० |
| | मणचेकरवाडी, गणेश विसर्जन स्थळ | | | | ०.८१ | | ०.८१ |
| रा.मा.१६५ | वरची सावंतवाडी | | | | ०.४१ | | ०.४१ |
| रा.मा.६६ | खालची सावंतवाडी | | ०.३३ | | | | ०.३३ |
| | ग्रा.मा.२२२ | | ०.७७ | | | | ०.७७ |
| **एकूण** | | **०.३३** | **१.२१** | **०.३८** | **८.७२** | | **१०.६४** |




आलेख क्र. २ देवधे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची दर्जा स्थिती (नियोजित व अनियोजित रस्ते)

**वरील आलेखामध्ये नियोजित रस्त्यांचा दर्जा हा सरळ स्थंभाने दर्शविला असून अनियोजित रस्त्यांचा दर्जा हा तुटक रेषांची कडा असलेल्या स्तंभाने दाखविले आहेत.**

## १०. गावातील पूल/ साकव/ कॉजवे यांची सद्यस्थिती

- बौद्धवाडी तर्फे देवधे या महसूल गावातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ६६ ला जोडणाऱ्या रस्त्यांवर २ मोठे पूल आहेत.
    i. लांजा शहराकडे जाणाऱ्या रा.मा.६६ या रस्त्यावर बेन नदी पात्रावर एक मोठा पूल आहे. याची साधारण लांबी ३३ मी असून १० मी रुंदी आहे. या पुलावर जवळपास अगणित लोकसंख्या अवलंबून असून पूल अत्यंत चांगल्या स्थितीत आहे.
    ii. राष्ट्रीय महामार्ग ६६ ते ग्रा.मा.२२ (बौद्धवाडी) ला जोडणारा अनियोजित रस्ता यावर एक पूल असून याची सद्यस्थिती चांगली आहे.

- देवधे या महसूल गावात एकूण २ कॉजवे आहेत.
    i. खालची सावंतवाडी येथे जाणाऱ्या अनियोजित रस्त्यावर कॉजवे आहे. याची सद्यस्थिती चांगली आहे.
    ii. ग्रा.मा.२५० (गवळीवाडी) ते ग्रा.मा.३ ला जोडणारा रस्ता यावर कॉजवे आहे. याची सद्यस्थिती चांगली आहे.

- मणचे या महसूल गावात एक पूल असून एका पावसाळी ओढ्यावर एक कॉजवे आहे.
    i. ग्रा.मा.३ पासून सुरु होणाऱ्या ग्रा.मा.४३ या नियोजित रस्त्याच्या शेवटी एक मोठा पूल आहे. हा पूल बेन नदीवर असून याची रुंदी ३.५ मी असून साधारण लांबी हि ३० मी इतकी आहे. पूलाला पुढे रस्ता जोडल्यास धुंदरे गावात जाण्यासाठी जवळचा रस्ता सुरु होऊ शकतो.
    ii. ग्रा.मा.४३ ला जोडणाऱ्या कवचेवाडी ते गणेश विसर्जन स्थळ येथील पावसाळी ओढ्यावर कॉजवे असून बाजूल एक पेशवेकालीन उघड बावडी नावाची विहिर आहे.

खालील तक्त्यामध्ये देवधे गावातील सर्वेक्षणामध्ये आढळलेले पूल व कॉजवे याबद्दलची माहिती दर्शवली आहे.

**तक्ता क्र. ६ सर्वेक्षणातून मिळालेली पूल/साकव/ कॉजवे याची माहिती**

| छायाचित्र क्रमांक | नाव | प्रकार | बांधणीचा प्रकार | लांबी (मी) | रुंदी (मी) | अवलंबित लोकसंख्या | अवलंबित गावे / वाड्या | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रा.मा.६६ या रस्त्यावरील बेन नदी पात्रावरवरील पूल | पूल | काँक्रीट बांधणी | ३३ | १० | अगणित | लांजा शहर | चांगली |
| २ | राष्ट्रीय महामार्ग ६६ ते ग्रा.मा.२२ (बौद्धवाडी) ला जोडणारा पूल | पूल | काँक्रीट बांधणी | - | - | ५००+ | गवाणे, कुर्णे, बौद्धवाडी | चांगली |
| ३ | ग्रा.मा.४३ या नियोजित रस्त्याच्या शेवटी असलेला पूल | पूल | काँक्रीट बांधणी | ३० | ३.५ | २००+ | देवधे, धुंदरे | चांगली |
| ४ | खालची सावंतवाडी अनियोजित रस्त्यावरील कॉजवे | कॉजवे | काँक्रीट बांधणी | - | ३ | ३००+ | खालची सावंतवाडी | चांगली |
| ५ | ग्रा.मा.२५० (गवळीवाडी) ते ग्रा.मा.३ ला जोडणाऱ्या रस्त्यावरील कॉजवे | कॉजवे | काँक्रीट बांधणी | - | ३ | १५०+ | गवळीवाडी, मणचे | चांगली |
| ६ | कवचेवाडी ते गणेश विसर्जन स्थळ येथील पावसाळी ओढ्यावर कॉजवे | कॉजवे | काँक्रीट बांधणी | - | २.५ | १००+ | देवधे (कवचेवाडी) | चांगली |

खालील छायाचित्र क्रमांक ६ मध्ये अनुक्रमे वरील माहितीनुसार देवधे गावातील पूल/साकव/कॉजवे यांची छायाचित्र दिलेली आहेत.




**छायाचित्र ६. देवधे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांवर असणारे पूल/साकव/कॉजवे**


## ११. इ- ग्रामस्वराज संकेतस्थळावरील उपलब्ध माहिती

eGramSwaraj हे पंचायती राज मंत्रालयाने तयार केलेले संकेतस्थळ आहे. eGramSwaraj चे उद्दिष्ट विकेंद्रित नियोजन, प्रगती अहवाल आणि कामांवरील आधारित लेखामध्ये उत्तम पारदर्शकता आणणे आहे. पंचायतींना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या संसाधनांचा वापर करून आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी पंचायत (ग्राम) विकास आराखडा (Village Action Plan ) तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ७ ग्राम विकास आराखड्यानुसार सन २०१९ ते २०२३ या वर्षातील रस्ते कामांच्या खर्चाचा तपशील**

| | वर्ष | रस्ता बांधणे/दुरुस्ती | पाखाडी बांधणे/दुरुस्ती | गटार बांधणे/दुरुस्ती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **ग्रामपंचायत देवधे** | २०१९-२० | २,०६,४६१ | ४,१९,४३५ | ४९,३०० | **६,७५,१९६** |
| | २०२०-२१ | ६३,६३८ | ३,००,००० | ४,९७,६१३ | **८,६१,२५१** |
| | २०२१-२२ | २,६७,२७५ | ८०,००० | - | **३,४७,२७५** |
| | २०२२-२३ | - | २७६१२५ | ४,३०,६२४ | **७,०६,७४९** |
| | **एकूण** | **५,३७,३७४** | **१०,७५,५६०** | **९,७७,५३७** | **२५,९०,४७१** |

वरील तक्त्यात देवधे ग्रामपंचायतीने २०१९-२०२३ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये पंचायत विकास आराखड्यानुसार रस्ता बांधणे/दुरुस्तीसाठी, पाखाडी बांधणे/दुरुस्ती व गटार बांधणे/दुरुस्ती यासाठीच्या खर्चाचा तपशील मांडला आहे. वरील तक्त्यानुसार पंचायत विकास आराखड्यामध्ये सर्वाधिक खर्च हा पाखाडी बांधणे/दुरुस्तीवर झाला आहे. मागील ५ वर्षांमध्ये वरील तीन कामांवर पंचायत विकास आराखड्यानुसार **२५,९०,४७१** रुपये खर्च झाले आहेत.




**आलेख क्र. २, २०१९ ते २०२३ या कालावधीत ग्राम विकास आराखड्यानुसार रस्ते कामांवर केलेला खर्च**

देवधे ग्रामपंचायत अंतर्गत गावांचे सर्वेक्षण करताना आढळून आलेल्या निरीक्षणानुसार पुढीलप्रमाणे कामांचा समावेश नवीन ग्रामविकास आराखड्यामध्ये समाविष्ट करता येऊ शकते.

- देवधे गावातील ग्रामीण मार्ग ४३ च्या शेवटी बेनी नदीवरील पूलाला पुढे रस्ता जोडणे.(धुंदरे गावात जाण्याकरिता जवळचा मार्ग)
- खालची सावंतवाडी येथील कॉजवे ची दुरुस्ती व गटारातील गाळ साफ करणे.
- कवचेवाडी ते गणेश विसर्जन तलाव व उघड बावडी (विहीर) पर्यंतचा रस्ता साफ (स्वच्छ) करणे.
- पेशवे कालीन (उघड बावडी) विहीरीचे बांधकाम करणे.
- शाळा व अंगणवाडी तसेच सार्वजनिक ठिकाणांपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांची साफसफाई करणे.
- वाडी अंतर्गत पाखाडी यांची देखभाल व दुरुस्ती करणे.

## ११. सारांश

- देवधे ग्रामपंचायतीत देवधे, मणचे आणि बौद्धवाडी तर्फे देवधे ही तीन महसुली गावे येतात. देवधे ग्रामपंचायत हद्दीचे एकूण क्षेत्रफळ हे १०३७.४८ हेक्टर असून दोनही गावांची मिळून एकूण लोकसंख्या २२३७ एवढी आहे.
- देवधे ग्रामपंचायत हद्दीतील नियोजित रस्त्यांची एकूण लांबी ही १४.८९ किमी आहे. त्यापैकी ग्रामीण रस्त्यांची लांबी ९.६३ किमी एवढी आहे, इतर जिल्हा मार्ग याची लांबी ०.१७ किमी आहे, राष्ट्रीय महामार्गाची लांबी ३.२३ किमी आहे व राज्य महामार्गाची लांबी ०.९९ किमी आहे.
- देवधे ग्रामपंचायत हद्दीतील अनियोजित रस्त्यांची एकूण लांबी ही १०.६३ किमी आहे.
- नियोजित रस्त्यांपैकी ५.२३ किमी लांबीचे रस्ते हे 'चांगल्या' दर्जाचे, ०.५४ किमी लांबीचे रस्ते हे 'मध्यम' दर्जाचे, ४.०९ किमी लांबीचे रस्ते हे 'खराब' दर्जाचे, १.१२ किमी लांबीचे रस्ते हे 'अति खराब' दर्जाचे, ३.४८ किमी लांबीचे रस्ते हे 'कच्चे' रस्ते या स्वरूपाचे आहेत.
- अनियोजित रस्त्यांपैकी ०.३३ किमी लांबीचे रस्ते हे 'मध्यम' दर्जाचे, १.२१ किमी लांबीचे रस्ते हे 'खराब' दर्जाचे, ०.३८ किमी लांबीचे रस्ते हे 'अतिखराब' दर्जाचे, ८.७२ किमी लांबीचे रस्ते हे 'कच्चे' रस्ते या स्वरूपाचे आहेत.
- मिळालेल्या दुय्यम माहितीनुसार **ग्रा.मा.४२** हा नियोजित रस्ता देवधे ग्रामपंचायत हद्दीमध्ये सर्वेक्षणात आढळलेला नाही.

## १२. शिफारशी

नियोजित आणि अनियोजित, दोनही प्रकारच्या रस्त्यांच्या बाबतीत, रस्त्याची लांबी, रस्त्याच्या सलग्न असणारी सार्वजनिक ठिकाणे व मालमत्ता, अवलंबित लोकसंख्या आणि दर्जा श्रेणी यांच्या आधारावर देवधे ग्रामपंचायत हद्दीतील रस्ते विकास कामांच्या प्राधान्य क्रमाबाबत पुढील शिफारशी करण्यात येत आहेत. कोणत्या रस्त्याला प्रथम/द्वितीय/तृतीय प्राधान्य द्यावे, तो रस्ता कुठपासून कुठपर्यंत आहे, रस्त्याची गावातील एकूण लांबी किती आणि तातडीने काम करणे आवश्यक आहे अशा भागाची लांबी किती हे पुढील तक्त्यात दर्शविले आहे. यावरून रस्ते विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरवता येईल.

**तक्ता क्र. ६ नियोजित रस्त्यांच्या विकासकामांचा प्राधान्यक्रम**

| प्राधान्य क्रमांक | रस्ता क्र. | पासून | पर्यंत | गावातील रस्त्यांची एकूण लांबी | तातडीने काम आवश्यक असलेल्या भागाची एकूण लांबी (किमी) (दर्जा श्रेणी ४, ५ व ६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.मा ३ | रा.मा.६६ | आसगे बेनी रोड | ३.५ | १.२ |
| २ | इ.जि.मा. १३० | रा.मा.६६, देवधे | गवाणे, कोलधे, कोट रस्ता | ०.१७ | ०.५ |
| ३ | ग्रा.मा २५० | रा.मा.६६ | ग्रा.मा.३, मधली वाडी | ०.६१ | - |
| | ग्रा.मा २२२ | ग्रा.मा ४३ | देवधे माळवाडी - बौद्धवाडी रस्ता | ०.९१ | ०.३ |
| | ग्रा.मा २५८ | ग्रा.मा.३ | हरमलेवाडी | ०.७३ | ०.२ |

**तक्ता क्र. ७ अनियोजित रस्त्यांच्या विकासकामांचा प्राधान्यक्रम**

| प्राधान्य क्रमांक | पासून | पर्यंत | गावातील रस्त्यांची एकूण लांबी | तातडीने काम आवश्यक असलेल्या भागाची एकूण लांबी (किमी) (दर्जा श्रेणी ४, ५ व ६) |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.मा.२२२ | बौद्धवाडी | ०.३ | ०.२ |
| २ | ग्रा.मा.२२२ | रा.मा.६६ | ०.७ | ०.४ |
| | | बौद्धवाडी | | |
| | | मणचेकरवाडी, शेत | | |
| | ग्रा.मा.४३ | मणचेकरवाडी | १ | - |
| | | मणचे स्मशानभूमी | | |
| | ग्रा.मा.४३ | मणचेकरवाडी | ०.१ | ०.१ |
| | ग्रा.मा.३ | होळीचा मांड, नवलाईदेवी मंदिर | ०.६ | ०.६ |
| | ग्रा.मा.३ | कोटकरवाडी | ०.४ | ०.४ |
| | | ब्राम्हणवाडी | | |
| | | खामकरवाडी | | |
| | ग्रा.मा.४३ | मणचेकरवाडी, गणेश विसर्जन स्थळ | ०.८ | ०.८ |
| | रा.मा.६६ | ग्रा.मा.२२२ | ०.८ | ०.८ |
| | ग्रा.मा.२५० | बौद्धवाडी नवीन वसाहत, माळवाडी | ०.८ | ०.८ |
| ३ | रा.मा.६६ | खालची सावंतवाडी | ०.३ | ०.३ |
| | ग्रा.मा.३ | रामभाऊ गुरव घर | ०.५ | ०.५ |
| | | गुरववाडी | | |
| | रा.मा.१६५ | वरची सावंतवाडी | ०.४ | ०.४ |
| | ग्रा.मा.३ | ग्रा.मा.२५० | ०.३ | ०.३ |
| | ग्रा.मा.२५० | बौद्धवाडी नवीन वसाहत, माळवाडी | ०.३ | ०.३ |
| | ग्रा.मा.२५० | नवीन बौद्धवाडी वसाहत, मालवाडी | ०.३ | ०.३ |
| | ग्रा.मा.२३८ | ग्रा.मा.२१४ | ०.२ | ०.२ |
| | ग्रा.मा.२१४ | गवाणे गवळीवाडी | ०.२ | ०.२ |
| | ग्रा.मा.२५८ | गोंधळीवाडी | ०.१ | ०.१ |

**संलग्नक**

i. **संकलित माहिती** - [https://drive.google.com/drive/folders/1lQFBeu_vVG1D662zMQYkAvdY2aOQUKy2?usp=drive_link](https://drive.google.com/drive/folders/1lQFBeu_vVG1D662zMQYkAvdY2aOQUKy2?usp=drive_link)

ii. **छायाचित्रे**















## संदर्भ


i. जनगणना तक्ते -
Census tables | Government of India (censusindia.gov.in)

ii. IRC SP20-2002 -
IRC SP 020: Rural Roads Manual : Indian Roads Congress : Free Download, Borrow, and Streaming : Internet Archive

iii. eGramSwaraj -
https://egramswaraj.gov.in/

iv. GPDP मार्गदर्शक तत्त्वे -
https://panchayat.gov.in/documents/20126/0/Revise+final+GPDP+Guildeline+maharashtra.pdf/42649552-d63c-b10b-14bb-c8c35b36042b?t=1554713527724

v. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना -
https://rdd.maharashtra.gov.in/pradhan_mantri-gram-sadak-yojnass

vi. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना -
https://rdd.maharashtra.gov.in/cm-gram-sadak-yojana

vii. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय -
https://morth.nic.in/state-public-works-department-pwd


## आभार


i. श्री. राजाराम हरमळे, सरपंच, ग्रा. पं. देवधे

ii. श्री. संजय मणचेकर, उपसरपंच ग्रा. पं. देवधे

iii. श्री. प्रदीप वासरे, ग्रामसेवक, ग्रा. पं. देवधे

iv. सर्व ग्रा. पं. सदस्य, कर्मचारी व देवधे ग्रामस्थ